शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर
विद्वत्प्रमाणित, यु.जी.सी. मान्यताप्राप्त त्रैमासिक
(Peer Reviewed Referred Research Journal)
ISSN No. 2319-6025

# शिविम संशोधन पत्रिका

वर्ष-आठवे : अंक सतरा-अठरा । जानेवारी ते जून २०१९

## श्रमसंस्कृती आणि साहित्य

दिनांक ९ आणि १० फेब्रुवारी, २०१९



कुणी न राहो दुर्बल अज्ञ । म्हणुनी हा शिक्षण यज्ञ ।।

माजी आमदार श्री. बाबासाहेब पाटील सरुडकर शिक्षण संस्थेचे

**श्री शिव-शाहू महाविद्यालय, सरूड**

ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर

नॅक तृतीय मूल्यांकन : B ग्रेड (CGPA- 2.41)

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्प्रमाणित त्रैमासिक

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Referred Research Journal )

ISSN No. 2319-6025

(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली, मान्यता अ. क्र. ६४१७५)

**वर्ष-आठवे : अंक सतरा-अठरा**

जानेवारी-फेब्रुवारी-मार्च, एप्रिल-मे-जून २०१९

## श्रमसंस्कृती आणि साहित्य

संपादक

**डॉ. शिवकुमार सोनाळकर**

कार्यकारी संपादक

**डॉ. नीला जोशी**

संपादक मंडळ

**डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. गोमटेश्वर पाटील, डॉ. तातोबा बदामे, डॉ. दिनेश वाघुंबरे**

संपादन सहाय्य

**प्रा. प्रकाश नाईक, प्रा. रघुनाथ मुडळे**

सल्लागार समिती

**डॉ. राजन गवस, डॉ. प्रकाश कुंभार, डॉ. डी. ए. देसाई, डॉ. अनिल गवळी**

**प्रकाशक**

अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

अनुराज, ७/ब, सूर्यवंशी कॉलनी, सानेगुरुजी वसाहत, कोल्हापूर ४१६ ०११

**मुद्रक**

भारती मुद्रणालय

८३२ ई वॉर्ड, शाहूपुरी ४ थी गल्ली, कोल्हापूर. फोन : (०२३१) २६५४३२९

मूल्य : रु. ३००/-

# अंतरंग


| | | |
|---|---|---|
| अध्यक्षीय मनोगत... | डॉ. शिवाजी विष्णू पाटील | ८ |
| श्रमसंस्कृती, साहित्य आणि बांधिलकी | डॉ. अनिल गवळी | १३ |
| ग्रामीण कष्टकरी स्त्रीचे चित्रण | एकनाथ पाटील | १८ |
| श्रमसंस्कृती आणि गोमंतकीय मराठी साहित्य | डॉ. विद्या प्रभुदेसाई | २७ |
| श्रमसंस्कृती आणि कोकणी साहित्य | डॉ. महेश स. बावधनकर | ३३ |
| सीमाभागातील श्रमसंस्कृती आणि साहित्य | डॉ.शिवाजीराव पाटील | ४२ |
| श्रमसंस्कृती आणि ग्रामीण साहित्य | डॉ. यशवंत चव्हाण | ४८ |
| श्रमसंस्कृती आणि भटक्याविमुक्तांचे साहित्य | डॉ. बाळासाहेब संतू चव्हाण | ५३ |
| श्रमसंस्कृती आणि स्त्रीवादी साहित्य | डॉ. लता पांडुरंग मोरे | ६६ |
| श्रमसंस्कृती आणि दलित साहित्य | डॉ. चंद्रकांत शंकर कांबळे | ७० |
| श्रमसंस्कृती आणि आदिवासी साहित्य | प्रा. डॉ. दीपककुमार वळवी | ७७ |
| श्रमसंस्कृती आणि ग्रामीण कष्टकरी स्त्री | डॉ.मानसी जगदाळे | ८१ |
| श्रमसंस्कृती आणि महानगरीय कविता | तेजस चव्हाण | ८७ |
| मधउत्पादक श्रमजीवी | श्री. दत्ता मोरसे | ९३ |
| भारतीय श्रमसंस्कृती आणि मराठी श्रमगीत परंपरा | प्रा. अनंता कस्तुरे | ९७ |
| नोकरी, व्यवसाय, करिअर करणारी स्त्री | प्रा. डॉ. शिवकुमार सोनाळकर | १०७ |
| महादेव मोरे : श्रमिक साहित्याचा आधारस्तंभ | प्रा. डॉ. रमेश पोळ | ११२ |
| खोत व दौंड यांच्या कादंबरीतील शेतकरी | डॉ. एकनाथ आळवेकर | ११६ |
| महादेव मोरेंच्या साहित्यातील विडी कामगार | प्रा. डॉ. संजय दशरथ पाटील | १२० |
| मराठी स्त्रीगीते आणि श्रमसंस्कृती | डॉ. नीला जोशी | १२३ |
| 'कुळंबीण' : शेतकरी स्त्रीच्या श्रमाचे चित्रण | डॉ. आनंद वारके | १२७ |
| जागतिकीकरण आणि मराठी कादंबरीतील श्रमिक | डॉ. प्रकाश दुकळे | १३० |
| महात्मा बसवण्णांचा श्रमसिद्धांत : 'कायकवे कैलासा' | डॉ. मांतेश हिरेमठ | १३३ |
| मराठी नाटकातील श्रमजीवींचे चित्रण | प्रा. डॉ. दत्ता पाटील | १३७ |
| म. फुले यांच्या साहित्यामधील श्रमिकांचे चित्रण | डॉ. अरुण शिंदे | १४३ |
| नारायण सुर्वे यांच्या कवितेतील कामगारविषयक जाणिवा | डॉ. शिवलिंग मेनकुदळे | १४६ |
| नारायण सुर्वेंच्या कवितेतील कामगार | प्रा. डॉ. शिवाजी महादेव होडगे | १५१ |

# श्रमसंस्कृती आणि दलित साहित्य

डॉ. चंद्रकांत शंकर कांबळे
किसन वीर महाविद्यालय, वाई

आपल्या समाजजीवनात पूर्वीपासून आजपर्यंत श्रम करणाऱ्या लोकांची संख्याही मोठी आहे, त्यामुळे उभे आयुष्य कष्टात काढणारा श्रमजीवी वर्ग हा साहित्याचा विषय होणेही स्वाभाविक आहे. खेड्यांत पुरेशे काम मिळत नसल्याने अनेक कुटुंबे शहरांकडे वळली व मिळेल ते काम करून उदरनिर्वाह करू लागली. गरीब वर्गाकडे स्वत:चे श्रम विकून जगणे ह्या पलीकडे दुसरे कोणतेही साधन नव्हते. 'मजूर' व 'कामगार' या दोन शब्दांविषयी नारायण सुर्वे म्हणतात, ''मजूर ह्या शब्दांची संकल्पना गरज म्हणून अशाच विविध तऱ्हेच्या कष्ट करणाऱ्या व्यवसायातून उत्पन्न झाली व ती सर्वत्र रूढ झाली. मात्र जेव्हा उद्योगधंदे वाढू लागले व यंत्रावर राबणाऱ्या मंडळींत स्वत:ची अस्मिता जागी झाली, ते संघटित झाले, तेव्हाच 'कामगार' हा शब्द रूढ झाला असावा. हा नवा शब्द घडवण्याची शक्ती इतिहासानेच प्रेरणा देऊन सिद्ध केली.''[१] 'मजूर' ते 'कामगार' हा शब्दप्रवास कसा झाला ते सुर्वे यांनी सांगितले आहे. 'कामगार' या शब्दात नवनिर्माण करण्याची शक्ती अंतर्भूत असते.

श्रम करणारी व्यक्ती म्हणजे श्रमिक, तेव्हा अशा व्यक्तींचे एकूणच भावविश्व कशा प्रकारचे असते, त्यांना कोणकोणत्या समस्यांना सामोरे जावे लागते, जगण्यासाठी करावा लागणारा आटापिटा व हे सारे करूनही वाट्याला येणारे डोंगरएवढे दु:ख त्याला हतबल करताना दिसते. परंतु त्यावरही मात करून तो उभारी घेण्याचा प्रयत्न करतो. श्रमिकवर्गात जातपात, धर्म नसतो, तर तो भांडवलदाराकडून पिळला जाणारा वर्ग असतो.

मराठी साहित्यातील दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, मार्क्सवादी साहित्य, आदिवासी, भटक्या-विमुक्तांचे साहित्य ही मराठी भाषेतील अविभाज्य प्रगत अंगे आहेत. या विविध साहित्य प्रकारांनी मराठी भाषेला अधिक समृद्ध केले आहे. ज्या वर्गाला-समाजाला जातीप्रथेच्या नावाखाली पाच हजार वर्षांहून अधिक काळ सत्ता-संपत्ती-ज्ञानापासून आणि सर्जनापासून वंचित ठेवले होते, त्यांना लोकशाहीने त्यांचे माणुसपणाचे हक्क प्राप्त करून दिले. त्याला शिक्षण मिळाल्यानंतर तो आपल्या व्यथा, यातना, छळ शब्दबद्ध करू लागला. या नव्या अभिव्यक्तीने मराठी भाषेच्या ऐश्वर्यात खऱ्या अर्थाने भर पडली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या उदयापूर्वी गोपाळबाबा वलंगकर, शिवराम जानबा कांबळे, किसन फागूजी बनसोडे यांनी अस्पृश्यांची दु:खे आपल्या लेखनातून मांडली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म ही विसाव्या शतकातील लक्षणीय घटना मानवी लागेल. आंबेडकरी विचारप्रणाली आणि दलितांची सामाजिक-राजकीय चळवळ ही दलित साहित्याची एकमेव प्रेरणा आहे. या प्रेरणेने जागृत होऊन दलित साहित्याच्या चळवळीचा प्रारंभ झाला. दलित साहित्याची चळवळ ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनातील अपूर्व आणि असामान्य अशी महत्त्वाची घटना होय. हजारो वर्षे मूक राहिलेल्या दलितांच्या अंत:करणातील व्यथा आणि वेदना, प्रक्षोभ आणि विद्रोह यांना या चळवळीमुळेच शब्दरूप


ISSN No. 2319-6025

मिळाले आणि अशा चळवळीतून निर्माण झालेल्या दलित साहित्याने एक नवा शक्तिस्त्रोत मराठी साहित्यात आणून सोडला. हे सारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य आणि विचार यांनी जागृत केलेल्या दलित आत्मभानामुळेच शक्य झाले. दलित साहित्य सामाजिक जाणिवेचे साहित्य आहे. समाजातील विषमता, अन्यायाविरुद्ध संघर्षाची जाणीव चेतविणारे व माणूस घडविणारे साहित्य आहे. समाजप्रबोधन व परिवर्तन हे त्याचे ध्येय आहे. सामाजिक क्रांती व नवसमाजरचना ते घडवू पाहते. दलित साहित्य हे कोण्या एका व्यक्तीचे नसून, ते सामूहिक मनाचा आविष्कार आहे.

दलित लेखकाने कविता, कथा, स्वकथन, कादंबरी, नाटक, वैचारिक लेखन आदी सर्व वाङ्मयप्रकारांतून आपली क्रांतिप्रवणता व न्यायप्रियता शब्दांकित केली आहे. दलित साहित्यिकांनी सर्वात प्रथम 'कविता' हा वाङ्मयप्रकार हाताळला. दलित साहित्य म्हटले म्हणजे, सर्वप्रथम कविताच आपल्या डोळ्यांसमोर येते. दलित कवीने जी कविता लिहिली आहे, ती स्वानंदासाठी नसून, परिवर्तनाच्या प्रक्रियेला गतिमानता देण्यासाठी लिहिली आहे. ज्या सामाजिक व्यवस्थेने त्यांच्यावर गुलामगिरी लादली ज्या धर्मव्यवस्थेने त्याला गुलागिरीच्या गर्तेत लोटले, त्या व्यवस्थेविरुद्ध आक्रमक पवित्रा घेऊन, तो तिला आव्हान देताना दिसतो.

'दलित' हा मूळातच काबाडकष्ट करून जीवन जगणारा समाज आहे. पोटाची भूक भागविण्यासाठी तो अहोरात्र परिश्रम करतो. उदरनिर्वाहाचे दुसरे कोणतेही साधन नसल्याने, तो श्रमाला अधिक प्राधान्य देतो. दलित कवितेमध्ये श्रम करणाऱ्या दलित समाजजीवनाचे चित्रण मोठ्या प्रमाणात येताना दिसते. अण्णा भाऊ साठे आपल्या 'कामगार स्तवन' या गणातून त्याच्या परिश्रमाचे वर्णन करताना म्हणतात,

''ज्याला जगी तुलना नाही।अंत पाताळाचा घेई।
उर ब्रह्मांडाचे फोडी। काळाची हाडे मोडी।
आकाश खाली ओढी। तो मी आज वंदिल।।''

अण्णा भाऊ साठे हे केवळ श्रमिकांच्या श्रमाचे वर्णन करून थांबत नाहीत, तर ते त्यांच्या कर्तृत्वालाही वंदन करताना दिसतात. पिढ्यान्‌पिढ्या अंधारात अज्ञानात खितपत पडलेल्या श्रमिकांना अण्णा भाऊ स्वाभिमानीवृत्तीने जगायला प्रवृत्त करतात. सावकार, जमीनदार, अन्याय करणारे गावचे पाटील, कुलकर्णी यांच्याविरुद्ध बंड करून उठणाऱ्या नायकाविषयी ते एके ठिकाणी म्हणतात,

''सावकारशाहीचा दूरवरी कुंदा, आरपार खुरपून पाडाया रेंदा
दाखवाया बळ उचल रे विळा पोलादी पाजळून आपला रं।।''

अशा गीतांमधून आण्णा भाऊ श्रमिकांच्या स्वाभिमानावर प्रकाश टाकताना दिसतात.

नामदेव ढसाळ यांच्या कवितेतून सामाजिक विषमता आणि आर्थिक विषमता ह्या दोहोंविरुद्धचा विद्रोह मोठ्या प्रमाणात व्यक्त झाला आहे. मजूर, स्त्रिया, कष्टकरी, दलित यांच्या बाजूने लेखन करून त्यांनी, त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. हा कवी केवळ दलितांचीच नव्हे, तर संपूर्ण मानवजातीची दु:खे वेशीवर टांगण्याचा प्रयत्न करतो. 'गोलपीठा' ह्या त्यांच्या पहिल्या काव्यसंग्रहाने मध्यमवर्गीय अभिरुचीला हादरे दिले. वेश्यावस्तीचे धक्कादायक चित्रण त्यांनी या संग्रहात केले आहे. शोषणाच्या प्रक्रियेत चिरडला गेलेला

श्रमिक हा त्यांच्या कवितेच्या केंद्रस्थानी आहे.

''हे जग तुझ्या श्रमावर चालले आहे किती रे करतोस रक्ताचे पाणी
मी तुलाच सर्जनाचा निर्माता मानतो बाकीच्यांचा हिशोब कशाला?''

'कामगार बंधो' (मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हालविले) या कवितेमधून ते कामगारांच्या कष्टाचे वर्णन करून, त्याचा विसर पडलेल्या व्यवस्थेवर टीका करताना दिसतात.

अशा प्रकारे अण्णा भाऊ साठे, नामदेव ढासळ, केशव मेश्राम, नारायण सुर्वे, वामन निंबाळकर, दया पवार, प्रल्हाद चेंदवणकर, त्र्यंबक सपकाळे, अर्जुन डांगळे, ज.वि. पवार, यशवंत मनोहर, प्रज्ञा लोखंडे, इ. कविंच्या कवितांमधून श्रम करणाऱ्या व व्यवस्थेविरुद्ध बंड करणाऱ्या दलितांचे चित्रण येताना दिसते.

दलित कवितेमध्ये जसे कष्टकरी दलित समाजाचे चित्रण येते, तसेच दलित कथेमधूनही ते येताना दिसते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार व आंदोलनातून प्रेरणा घेऊन दलित साहित्य उदयाला आले. दलित साहित्य म्हणजे भारतीय संस्कृतीच्या तळाशी पेटलेले एक अग्निकुंड आहे आणि दलित कथा ही या अग्निकुंडातील एक ठिणगी आहे.३ प्रा. गंगाधर पानतावणे यांनी दलित साहित्य व दलित कथेच्या संदर्भात मांडलेले मत दलित साहित्याची आणि म्हणूनच दलित कथेची वैशिष्ट्ये सांगणारे आहे. दलित कथा ही मनोरंजनासाठी कधीच नव्हती दलित जीवनाचे विदारक वास्तव ती प्रखरपणे मांडताना दिसते.

आंबेडकरी विचाराने अस्मिता जागृत झालेल्या दलित कथाकारांच्या पहिल्या पिढीने मराठीतील दलित कथेचा पाया मजबूत केला. ना. रा. शेंडे, अण्णा भाऊ साठे, शंकरराव खरात, बंधुमाधव मोडक इ. कथालेखक दलित कथाकारांच्या पहिल्या पिढीचे नेतृत्व करतात.

बंधुमाधव यांची 'विखारी भाकरी' ही कथा, आंबेडकरी विचाराने झपाटलेल्या महादेव व दैनंदिन जीवन जगण्यासाठी धडपडणाऱ्या येताळ्या या व्यक्तिरेखांवर आधारित आहे. सुगीच्या दिवसात पोटासाठी कुठे खाळणी, मळणी मिळते का, म्हणून येताळ्या आपल्या नातवाला म्हणजे महादेवला घेऊन बापू पाटलाच्या खळ्यावर जातो. घरी जाताना बापू पाटील त्यांना बजावून सांगतो की, ''न्याहारी करून परत येईपर्यंत हे खळं तयार करून ठिवा........संध्याकाळला मळणीसाठी बैलं जुपूच! आवरा बिगीबिगी! बैतं बलुतं पाहिजी, मग काम करायला नगं?''[४] त्यानंतर येताळ्या ग्यानबा पाटलाच्या खळ्यावरून तिवडा आणि धान्य आणण्यासाठी जातो. बापू पाटील घराकडून परत येतो, तेव्हा त्याला खळं पूर्ण झाल्याचे दिसत नाही. तो म्हणतो, महाराची जात, काम करायला नगं नुसत्या टिवल्या-बावल्या कराया व्होवं.५ एवढे कष्ट करूनही, तो दलित आहे म्हणून त्याच्यावर आगपाखड करणारा बापू पाटील उपाशी येताळ्याला मापटंभर जोंधळंही देत नाही. अशावेळी भुकेलेला येताळ्या स्वत:साठी व कुटुंबासाठी बापू पाटलाच्या बैल्यांच्या पुढ्यात पडलेले चार-सहा दिवसांचे शिळे बुरसटलेले व शेणामुतात भिजलेले भाकरीचे तुकडे घरी नेऊन कोरड्यास्यात उकडून खातो. असे हे विषारी अन्न खाल्याने येताळ्याला उलट्या-जुलाब होऊन त्यातच त्याचा मृत्यू होतो. येताळ्याचे हे मरण अस्वस्थ करणारे आहे. उद्रेकाला जन्म देणारे आहे. काबाडकष्ट करणाऱ्या दलित येताळ्याचा बळी इथल्या व्यवस्थेने घेतला आहे. 'महारवतन म्हणजे विसाव्या शतकातील गुलामगिरी आहे,' असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले


ISSN No. 2319-6025

आहे. या महारवतनी कामातून कष्टकरी दलितांचा पोटापाण्याचाही प्रश्न सुटत नाही. बंधुमाधव यांनी येताळ्याच्या माध्यमातून कष्टकरी दलित समाजाच्या भुकेचे चित्र रेखाटले आहे.

अण्णा भाऊ साठे हे दलित कथाकारांच्या पहिल्या पिढीतील एक महत्त्वाचे कथाकार आहेत. कामगार, कष्टकरी, शेतकरी, अस्पृश्य, भटके, गुन्हेगार यांच्या जीवनातील अनेक प्रश्न त्यांनी आपल्या कथांमधून मांडले आहेत. कथालेखनामागची आपली भूमिका विशद करताना अण्णा भाऊ साठे म्हणतात, ''माझी जीवनावर फार निष्ठा असून मला माणसं फार आवडतात. त्यांची श्रमशक्ती महान आहे. ती जगतात, जगाला जगवतात. त्यांच्या बळावर हे जग चालतं. त्यांची झुंज, त्याचं यश यावर माझा विश्वास आहे.''[६] अशाप्रकारे वर्गीय जाणिवेतून त्यांचे कथालेखन झालेले दिसून येते.

अण्णा भाऊंच्या कथेतील नायक विविध प्रकारचे प्रश्न घेऊन संघर्ष करताना दिसतात. कधी हा संघर्ष झोपडपट्टीतील माणसाचा असतो, तर कधी खेडूत जीवन जगणाऱ्या व्यक्तीचा असतो. कधी हा संघर्ष पोटात अन्न घालण्यासाठी उचलणाऱ्या कष्टाचा असतो. 'स्मशानातील सोनं' या कथेतील 'भीमा' हा खाणीत दगड फोडण्याचे काम करतो, परंतु एवढे जीवघेणे कष्ट करूनही तो आपले कुटुंब व्यवस्थित सांभाळू शकत नाही. अशावेळी तो मेलेल्या माणसांच्या तोंडातील सोनं मिळवून व ते विकून कुटुंब आनंदात ठेवण्याचा प्रयत्न कारतो. 'भीमा' प्रेत उकरताना कोल्ह्याशी झुंज देतो. पोटाचा प्रश्न सोडविण्यासाठी तो हिंस्त्र प्राण्यासोबत झगडा करतो. पोट भरण्यासाठी निरनिराळी कामे करण्यासाठी माणसं, अन्न मिळत नाही म्हणून पिचून गेलेली माणसं अण्णा भाऊंच्या कथेचा विषय झालेली आहेत. त्यांच्या कथेतील नायिका दलित, कष्टकरी, शेतमजूर, कामगार आहेत. 'पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरली नसून, ती कष्टकऱ्यांच्या, शेतमजुरांच्या तळहातावर तरली आहे' हे त्यांना सांगायचे आहे.

अण्णा भाऊ साठे व बंधुमाधव यांच्या समकालीन लेखन करणारे शंकरराव खरात हे प्रारंभीच्या काळातील एक प्रमुख कथाकार आहे. समाजातील वास्तवचित्रे ते कथेच्या माध्यमातून शब्दबद्ध करतात. त्यांच्या कथेचे वैशिष्ट्य सांगताना प्रा. गंगाधर पानतावणे म्हणतात, ''दलित जीवनातील समाजशास्त्रीय तपशील देणारे खरात हे एकमेव कथाकार आहेत.''[७] त्यांच्या 'सांगावा' कथेतील 'रामा महार' उपाशीपोटी राहून गावकीची कामे प्रामाणिकपणे करतो. त्याची बायको 'साऊबाई' त्याला म्हणते, ''तुमचं सदान्‌कदा काम-काम! ही सोन्यासारखी पोरं भुकेनं तारताळ्या देत्याती, तेंचं काय करू?'' (सांगावा) स्वत:च्या मुलांपेक्षा गावाच्या कामाला प्राधान्य देणारा 'रामा महार' लक्षवेधी ठरताना दिसतो.

पहिल्या पिढीची कथा स्थिर होत असतानाच दुसऱ्या पिढीतील महत्त्वाचे कथाकार बाबुराव बागूल यांची कथा विद्रोहाचे रूप धारण करून, मराठी साहित्याच्या प्रांतात दाखल झाली. त्यांची कथा जीवनाचे विदारक वास्तव प्रकट करताना दिसते. 'विद्रोह' या कथेतील शिकला- सवरलेला 'जय' नावाचा भंगी तरुण भावी जीवनाची उज्ज्वल स्वप्ने पाहतो, परंतु इथल्या चार्तुर्वण्यव्यवस्थेत त्याच्या स्वप्नांचा जन्मजात अस्पृश्यतेमुळे कसा चुराडा होतो, याचे प्रत्ययकारी चित्रण या कथेत येताना दिसते. अस्मिता जागृत झालेला 'जय' हा भंगी तरुण, पारंपरिक भंगीकाम करण्याचे नाकारतो, परंतु त्याला इथल्या चार्तुर्वण्यव्यवस्थेत दुसरे काम मिळत नाही, त्याला भंगीकामच करावे लागते. त्यामुळे देश, देव, धर्म व इथली

संस्कृती यांच्याविरुद्ध तो पेटून उठतो.

अशा प्रकारे योगीराज वाघमारे, वामन होवाळ, अविनाश डोळस, अर्जुन डांगळे, रविचंद्र हडसनकर, भीमसेन देठे, शरणकुमार लिंबाळे, ऊर्मिला पवार, बळवंत कांबळे इ. कथालेखकांच्या अनेक कथांमधून कष्टकरी दलितांचे चित्रण येताना दिसते. दलित कथेविषयी आपले विचार मांडताना डॉ. अनिल गजभिये म्हणतात, ''चार्तुर्वर्ण्याधिष्ठित समाजरचनेतील चौथ्या वर्गाचे सामाजिक दु:ख त्यातून जन्माला आलेले अस्पृश्यतेचे चटके, तसेच गावकुसाबाहेर राहण्याची सक्ती, अन्नक्षुधा यांची वर्णने या कथाकारांनी नि:संकोचपणे केली आहेत. आपल्या कथेतून दारिद्र्याचे चित्रण करताना हे दारिद्र्य वर्णाधिष्ठित समाजरचनेमुळे आले आहे, असे लिहिण्याची धास्ती वाटण्याचे कारण नाही. दारिद्र्यापायी अन्नक्षुधा शांत होत नाही आणि अन्नक्षुधा शांत होण्यासाठी असहनीय, अस्वीकारणीय, अपमानित कामे करावी लागतात, हा विचार सांगण्याचा मोठेपणा दलित कथेने दाखविला आहे.''[८]

दलित साहित्यामध्ये कवितेच्या खालोखाल आत्मकथन हा वाङ्मयप्रकार अधिक प्रमाणात पाहावयास मिळतो. दलितांच्या आत्मकथनामुळे मराठी साहित्याचे दालन संपन्न झाले आहे. ज्या कलाकृती आपल्यासमोर येतात, त्यामध्ये 'बलुतं' (दया पवार) 'आठवणींचे पक्षी' (प्र. ई. सोनकांबळे), 'मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे' (माधव कोंडविलकर), 'उपरा' (लक्ष्मण माने), 'काट्यावरची पोटं' (उत्तम बंडू तुपे), 'तराळ अंतराळ'(शंकरराव खरात), 'अंत:स्फोट' (कुमुद पावडे), 'गबाळ' (दादासाहेब मोरे)', 'आभरान' (पार्थ पोळके), 'अक्करमाशी' (शरणकुमार लिंबाळे), 'जिनं आमुचं' (बेबी कांबळे), 'उचल्या' (लक्ष्मण गायकवाड), 'मरणकळा' (जनाबाई गिऱ्हे), 'कोल्हाट्याचं पोर (किशोर शांताबाई काळे) इत्यादींचा उल्लेख करता येईल. या आत्मकथनांमधून प्रस्थापित समाजव्यवस्थेने दलितांवर लादलेल्या दु:खद जीवनाचे चित्रण लेखक करताना दिसतात. डॉ.भालचंद्र फडके दलित आत्मकथनांना 'दु:खाच्या अभंगगाथा'[९] असे म्हणतात.

दलित आत्मकथनांत भुकेसाठी दलितांना कराव्या लागणाऱ्या जीवनसंघर्षाची चित्रे मोठ्या प्रमाणात रेखाटलेली आढळतात. 'बलुतं' या दया पवार यांच्या आत्मकथनाविषयी आपले मत मांडताना डॉ. वासुदेव मुलाटे म्हणतात, ''दलितांच्या दु:खाला कारणीभूत झालेली ही समाजव्यवस्था आणि लोकाचार यांचे दर्शन दलितांच्या आत्मकथनांमधून घडते. बलुतं हे मागण्याची पद्धती, त्यांची कामं, गावकीची कामं, गावकीची काठी त्यामुळे निर्माण झालेल प्रश्न, दलितांचे सण, जत्रा, नवस-सायास, अंधश्रद्धा, लग्नविधी,[१]अंत्यसंस्कार या साऱ्यांमधून जसे दर्शन घडते, तसेच त्यांच्या मानसिकतेचेही दर्शन घडते.'' गावातील बारा बलुतेदारांना सवर्णांची सेवा करावी लागत होती व त्यानंतरच त्यांना बलुतं मिळत होतं. दिवस-रात्र सेवा-चाकरी करूनही त्यांच्या वाट्याला सुख येत नव्हते. दलित आत्मकथनात येणारा पुरुष हा श्रम करणारा दिसतो, तशा स्त्रियाही सतत राबणाऱ्या व संसारात नवऱ्याला साथ देणाऱ्या दिसतात. अशाप्रकारे दलित आत्मकथनांमधून श्रम करणाऱ्या दलितांचे जसे दर्शन घडते, तसेच त्यांच्यावर अन्याय करणाऱ्या सवर्णांचेही दर्शन घडताना दिसते.

दलित कादंबरी लिहिणारे कादंबरीकार म्हणून प्रामुख्याने अण्णा भाऊ साठे, शंकरराव खरात व प्रा. केशव मेश्राम यांचा विचार करावा लागतो. अण्णा भाऊ साठे यांच्या 'फकिरा'


ISSN No. 2319-6025

कादंबरीतील 'फकिरा' ही व्यक्तिरेखा पोटासाठी संघर्ष करताना दिसते, तर शंकरराव खरातांच्या 'झोपडपट्टी' तील पात्रे पोटासाठी राबताना दिसतात. अशावेळी दलित कादंबरीतील श्रमशक्तींचा उद्घोषच मराठी साहित्याच्या महानतेसाठी कारणीभूत ठरतो.

नामदेव ढसाळ यांची 'हाडकी हाडवळा' ही कादंबरी जिवंत असा गावगाडा साकारताना दिसते. 'बायजा' या कर्तबगार स्त्रीला नायकत्व देऊन तिच्या कर्तृत्वाची ओळख या कादंबरीतून लेखक करून देतो. पाटलाच्या घरची कामे महारांनी करावी, हा पिढ्यान्‌पिढ्यांचा वारसा आणि त्यामुळे होणारी दलित लोकांची कुचंबना लेखक या कादंबरीत चित्रीत करताना दिसतो. बायजाचं जीवन संघर्षमय आहे, तिला विविध पातळ्यांवर संघर्ष करावा लागतो. प्रस्तुत कादंबरीतील 'बायजा' ही श्रम करणारी स्वावलंबनाचे महत्त्व पटलेली, स्वत:च्या शीलाला प्राणपणाने जपणारी व्यक्तिरेखा लक्षवेधी ठरताना दिसते. आज अनेक दलित लेखक कादंबरी लिहिताना दिसतात, त्यामध्ये कष्टकरी दलितांच्या वर्णनाबरोबर, त्यांच्या संघर्षाचेही चित्रण येताना दिसते.

दलित साहित्यात इतर वाङ्मय प्रकारांप्रमाणेच 'नाटक' हा वाङ्मय प्रकारही विकसित झाला आहे. १८८५ साली म. फुले यांनी 'तृतीयरत्न' हे नाटक लिहून, त्यामध्ये शेतीत राबणाऱ्या व त्याला नाडवणाऱ्या ब्राह्मणवर्गाचे चित्रण येताना दिसते. खऱ्या अर्थाने, दलित नाटकाचा उगम हा फुल्यांपासूनच झाला, असे म्हणता येईल. त्यानंतर जलसा, प्रहसन, दंढार हे सर्व नाट्यप्रकार प्रामुख्याने पूर्वाश्रमीच्या महार सामाजातून उदयास आले असून, ते आजच्या दलित नाटकाचे पूर्वरूप आहेत. १९५५ साली म. भि. चिटणीस यांचे 'युगयात्रा' हे नाटक प्रसिद्ध झाले व त्याचा पहिला प्रयोग डॉ. बाबासाहेब आंबेडकर व माईसाहेब आंबेडकर यांच्या उपस्थितीमध्ये नागपूरच्या दीक्षाभूमीवर सादर केला. रामायण काळापासून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या काळापर्यंत दलित समाजाची जी स्थिती होती, तिचे चित्रण या नाटकात आले आहे.

दलित साहित्यचळवळीसोबत दलित नाटके लिहिली जाऊ लागली. दलित नाटकांच्या आजपर्यंतच्या वाटचालीतील महत्त्वाचे नाटककार म्हणून भि. शि. शिंदे, प्रेमानंद गज्वी, दत्ता भगत, रामनाथ चव्हाण, टेक्सास गायकवाड, प्रभाकर दुपारे, प्रकाश त्रिभुवन, रुस्तुम अचलखांब, अविनाश डोळस, मधुसुदन गायकवाड, संजय पवार इत्यादीचा उल्लेख करावा लागेल. सर्व दलित नाटककारांच्या नाटकांमधून शोषणमुक्तीचा विचार येताना दिसतो. प्रकाश खरात म्हणतात, ''समाजजीवनात अस्पृश्यता, जातीवाद, श्रेष्ठ-कनिष्ठता, दारिद्र्य ह्या सगळ्या गोष्टींनी थैमान घालीत दलित माणसाला हजारो वर्षे जमीनदोस्त केले. साधे घोटभर पाणी मिळू दिले नाही. अन्न, वस्त्र, निवारा या आवश्यक गरजाही मिळू दिल्या नाहीत. तो अधिकार प्राप्त करण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी लढे उभे केले. स्वतंत्र भारतात दलित, आदिवासी, भटका-विमुक्त माणूस खरोखर स्वतंत्र भारताचा समान अधिकार भोगणारा नागरिक होऊ शकला नाही. कायद्याने समानता दिली; परंतु पारंपरिक वर्णवादी समाजाने मध्ययुगीन मानसिकता सोडली नाही. श्रेष्ठ-कनिष्ठ दृष्टिकोन सोडला नाही.[११]

सारांश, दलित साहित्याचे तत्त्वज्ञान दारिद्र्य, अस्पृश्यता, जातीसंस्था, वर्णव्यवस्था यांना नाकारणारे आणि समता, स्वातंत्र्य व बंधुभाव यांना स्वीकारणारे आहे. दलित,


ISSN No. 2319-6025

आदिवासी, शेतकरी-कष्टकरी समूहाला इथल्या व्यवस्थेने शोषणाखाली भरडले, त्याला वाचा फोडण्याचे काम दलित साहित्याने केले.

**संदर्भ**


१. 'कविता श्रमाची', नारायण सुर्वे, (संपा.), प्रकाशक- कल्याण आयुक्त,पहिली आवृत्ती- १९९३, पृ. चार शब्द

२. तत्रैव पृ. चार शब्द

३. 'दलित कथा' प्रा. गंगाधर पानतावणे, प्रा. चंद्रकुमार नलगे (संपा.) प्रस्तावना पृ. ६

४. 'विखारी भाकरी' बंधुमाधव, 'गावकुसाबाहेरील कथा' डॉ. शरणकुमार लिंबाळे (संपा.) पृ. ३०, ३१

५. तत्रैव पृ. ३१

६. 'खुळंवाडी' अण्णा भाऊ साठे विद्यार्थी प्रकाशन, पुणे ९, प्रथमावृत्ती १९५७, प्रस्तावना पृ. ३६

७. 'दलित कथा' प्रा. गंगाधर पानतावणे, प्रा. चंद्रकुमार नलगे (संपा.) पृ. १३

८. 'दलित साहित्य विचार आणि वैभव', डॉ. अनिल गजभिये, श्री अहिल्या प्रकाशन, इंदूर १९९१, पृ. १९, २०

९. 'अस्मितादर्श दिवाळी अंक' १९८३,पृ. ८५

१०. 'दलितांची आत्मकथने संकल्पना व स्वरूप', डॉ. वासुदेव मुलाटे, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद. पृ. ६६

११. 'दलित साहित्य' प्रकाश खरात (निबंध), साठोत्तरी मराठी वाङ्मयातील प्रवाह, डॉ. शरणकुमार लिंबाळे (संपा.) पृ. १३०, १३१


◆



ISSN No. 2319-6025